264

(13)

ISSN: 2454-5503
IMPACT FACTOR: 3.012(IIJIF)
(UGC Approved Journal No. 63716)

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

VOL 3 NO. 6 Nov, 2017

A BIMONTHLY REFEREED INTERNATIONAL JOURNAL

**SPECIAL ISSUE**
On the Occasion of
UGC Sponsored One Day National Seminar On

## IMPACT OF GLOBALIZATION ON RURAL INDIA

21st November, 2017




*Guest Editors*
**Dr. Subhash K. Pawar**
**Mr. Vikas T. Adlok**

Assistant Professor
Lokmanya Mahavidyalaya, Warora
Dist. Chandrapur

ORGANIZED BY

**DEPARTMENT OF SOCIOLOGY**
**LATE DATTATRAYA PUSADKAR ARTS COLLEGE,**
**NANDGAON PETH, TQ. DIST. AMRAVATI (MS).**

263

Scanned with CamScanner

266

(13)

ISSN: 2454-5503

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES (CHCS)

A BIMONTHLY REFEREED INTERNATIONAL JOURNAL

Vol. 3 No. 6 Nov. 2017

(UGC Approved Journal No. 63716)

Impact Factor: 3.012 (IIJIF)

## SPECIAL ISSUE

UGC Sponsored One Day National Seminar On

## Impact of Globalization on Rural India

21st November, 2017

*Organized by*

DEPARTMENT OF SOCIOLOGY
LATE DATTATRAYA PUSADKAR ARTS COLLEGE,
NANDGAON PETH, TQ. DIST. AMRAVATI.
*(Accredited B Grade by NAAC)*

*Guest Editors*

**Dr. Subhash K. Pawar**
**Mr. Vikas T. Adlok**

Assistant Professor
Lokmanya Mahavidyalaya, Waroi.
Dist. Chandrapur

MGEW SOCIETY'S
CENTRE FOR HUMANITIES AND CULTURAL STUDIES
KALYAN (MAHARASHTRA)
Contact: +91 9730721393 +91 8329000732 chcskalyan@gmail.com

265

Scanned with CamScanner

**Full Journal Title:** Chronicle of Humanities & Cultural Studies(CHCS)
**Print ISSN:** 2454-5503
**UGC Approved Journal No.** 63716
**Impact Factor:** 3.012 (IIJIF)
**Frequency:** Bimonthly / **Language:** Multi language / **Journal Country/Territory:** India
**Publisher:** Centre for Humanities & cultural Studies, A-102, Sanghavi Regency, Sahyadrinagar, Kalyan (W) (MS).
**Subject Categories:** Humanities & Cultural Studies

*Chief Editor*
**Dr Kalyan Gangarde**
Director, Centre for Humanities and Cultural Studies, Kalyan (W)
*Executive Editor*
**Dr Grishma Khobragade,** Asst. Prof., Birla College, Kalyan (W)
*Co- editors*
**Dr. Sadhana Agrawal,** Asst. Professor, Maharani Laxmibai Govt. College of Excellence, Gwalior (M.P.) India
**Pandurang Barkale,** Asst. Professor, Dept of English, SNDT Women's University, Churchgate, Mumbai
**Bharat Gugane,** Asst. Professor, Bhosala Military College, Nashik, Maharashtra
**Dashrath Kamble,** Asst. Professor, S.B.College, Shahapur, Dist. Thane, Maharashtra
**Sachin Bhumbe,** Asst. Professor, P. N. Doshi College, Ghatkopar, Mumbai

EDITORIAL ADVISORY BOARD
**Aju Mukhopadhyay,**
a poet, author and critic, 8 Cheir Lodi Street, Pondicherry, India.
Email: ajum24@gmail.com
**Dr R.T. Bedre,**
Principal RSPMS' SPP College, Sirsala, Dist. Beed (MS)
**Dr (Mrs.) Smita R. Nagori,**
Head,PG Department of English, M.U.College Udgir, Dist. Latur, Maharashtra, India. Email: smita.lakhotiya@gmail.com
**Dr Arvind Nawale**
Head, Department of English, Shivaji Mahavidyalaya Udgir, Dist. Latur (Member, BoS in English, Former Member of the Senate, Faculty of Arts, SRTM University, Nanded amnawale@gmail.com
**Dr Kailash Nimbalkar,**
Principal, S.B.College, Shahapur, Dist. Thane, Maharashtra, India. Email: nimbalkar_8@rediffmail.com.
**Tsai-ching Yeh**
Assistant professor, Department of English, National Taipei University of Technology. (Taivan)
**Dr B. N. Gaikwad,**
Vice Principal, N.G. Acharya and D.K. Marathe College of Arts, Commerce and Science , Chembur (East), Mumbai-400071
**Dr Simon Philip,**
Assistant professor, Department of Social Work, Voorhees College, Vellore
**Dr Binu Anitha Josheph**
Assistant professor, Department of English, Voorhees College, Vellore
**Dr Chandrashekhar Kanase**
Head, Department of Dramatics, SPP College, Sirsala, Dist Beed (MS)

EDITORIAL BOARD
**Dr Rajivkumar Dumka,** Zarkhand.
**Dr.Mahendra Shinde,** Associate Professor and Head, Department of English, N.M. Sailu, Dist. Parbhani, Maharashtra, India.
**Ram Bhise,** Assistant Professor, Saraswati College of Engineering, Kharghar, Navi Mumbai Maharashtra,India.
**Dr Asish Gupta,** Asst. Professor, J. H. Govt. P. G. College, Betul MP.

| Subscription Rates | | |
|---|---|---|
| | Annual membership (Individual) | Rs. 1,800 (150 $ for foreigners) ( Six Issues ) |
| | Bi-annual Membership | Rs. 3,500 (250 $ for foreigners) |
| | Institutional annual membership | Rs. 2,200 |
| | Institutional Bi-annual membership | Rs. 4,200 |

*Those interested in making online transactions, the following details may be of use:*

| Bank Name | Account Name | Account Number | IFSC code |
|---|---|---|---|
| Canara Bank (Branch: New Marine Lines, Mumbai) | Centre for Humanities & Cultural Studies | 1389101071921 | CNRB0001389 |

*DISCLAIMER: Academic facts, views and opinions published by authors in the Journal express solely the opinions of the respective authors. Authors are responsible for their content, citation of sources and the accuracy of their references and biographies/references. The editorial board or Editor in chief cannot be held responsible for any lacks or possible violations of third parties' rights.*

Assistant Professor
Lokmanya Mahavidyalaya, Warora
Dist. Chandrapur

266

Scanned with CamScanner

268




| | | | |
|---|---|---|---|
| 17 | जागतिकीकरण आणि भारतीय श्रमबाजारपेठ | प्रा. स्वाती एम. उगेमुगे | 153 |
| 18 | जागतिकीकरण आणि भारतीय शेती : एक दृष्टीक्षेप | डॉ. बळीराम प. अवचार | 156 |
| 19 | जागतिकीकरणाचा ग्रामिण समुदायावरील प्रभाव : एक समाजशास्त्रीय अध्ययन | प्रा. सविता महाजन | 160 |
| 20 | जागतिकीकरणाचा ग्रामिण समाजावरील प्रभाव : एक समाजशास्त्रीय अध्ययन | प्रा. जयश्री घुगे | 164 |
| 21 | ग्रामीण समाजजीवनावर जागतिकीकरणाचा प्रभाव | प्रा. सागर बडगे | 168 |
| 22 | जागितिकीकरणाचा भारतीय कृषी क्षेत्रावर होणारा परिणाम | डॉ. विजय नागरे | 172 |
| 23 | जागितिकीकरणाचा कृषी क्षेत्रावर पडलेला प्रभाव | प्रा. होमराज टी. रोठाड | 176 |
| 24 | जागतिकीकरणाचा भारतीय ग्रामीण सामाजिक जीवनावरील प्रभाव | प्रा. प्रदिप ल.अंबोरे | 180 |
| 25 | जागतिकीकरणाचा भारतीय शेती व्यवसायावर परिणाम | डॉ. श्रीनिवास पिलगुलवार | 182 |
| 26 | जागतीकीकरणाचा ग्रामीण भारतावरील परिणाम | प्रा. अस्मिता आर. ठोंबरे | 188 |
| 27 | जागतिकीकरणाचे ग्रामीण समाज संरचनेवर होणाऱ्या परिणामाचे समाजशास्त्रीय अध्ययन | डॉ.सुधा मु. खडके (कडू) | 191 |
| 28 | जागतिकीकरण आणि जागतिक श्रमशक्ती | डॉ. स्वराली चं. कुलकर्णी | 196 |
| 29 | जागतिकरणाचा भारतीय शेतीवर प्रभाव | प्रा. मनोहर रा. चौधरी | 200 |
| 30 | जागतिकीकरण आणि ग्रामिण समाज | डॉ. बि. पि.उबाळे | 204 |
| 31 | जागतीकीकरणाचा भारतीय कृषी क्षेत्रावरील परीणाम | प्रा.अनिल वि.वानखडे | 207 |
| 32 | जागतिकीकरण आणि ग्रामीण जीवनावर प्रभाव | प्रा. दामोदर दुधे | 209 |
| 33 | जागतिकीकरण व भारतीय शेतीवरील परिणाम | प्रा.सुजाता आर.नाईक (गवई) | 211 |
| 34 | जागतिकीकरणाचा ग्रामीण व आदिवासी कामगारावरील परिणाम : समाजशास्त्रीय अध्ययनाचा नवा संदर्भ | डॉ. आनंद वनकर | 216 |
| 35 | जागतिकीकरणाचा भारतावरील प्रभाव - एक विश्लेषणात्मक अध्ययन | प्रा. अमरिष एस. गावंडे | 220 |
| 36 | जागतिकीकरणाचा भारतीय शेतीवरील परीणाम | डॉ. सचिन ज. होले,<br>डॉ. एस. एस. सोमवंशी | 225 |
| 37 | जागतिकीकरण आणि ग्रामीण स्त्री | प्रा. पुरुषोत्तम आर. बांडे | 228 |
| 38 | **जागतिकीकरणाचे भारतीय शेतीवरील परिणाम** | **प्रा. नंदकिशोर उ.राऊत** | 232 |
| 39 | जागतिकीकरणाचा ग्रामीण समाजावरील प्रभाव ... | डॉ. छाया नेम्मानीवार | 236 |
| 40 | जागतिकीकरण - ग्रामीण समाज जीवन | प्रा. दिपक सां.देशमाने | 240 |
| 41 | पर्यावरण-हास व मानवी आरोग्य : एक ज्वलंत समस्या | प्रा. राजेश पां. मेश्राम | 244 |
| 42 | जागतिकीकरणाचा ग्रामीण समाजावर पडलेला प्रभाव : एक समाजशास्त्रीय अध्ययन | डॉ.बी.एच.किर्दक | 246 |
| 43 | जागतिकीकरणाचे सामाजिक, व्यवसायिक व राजकीय घटकांना प्रभावीत करणारे घटक | प्रा. राजेश ब्राम्हणे | 248 |
| 44 | जागतिकीकरणाचा ग्रामीण भागावर झालेल्या परिणामाचे अध्ययन | डॉ. विशाखा जगन्नाथ डेरे | 251 |


Assistant Professor
Lokmanya Mahavidyalaya, Waro



267

Scanned with CamScanner

Chronicle of Humanities and Cultural Studies
(UGC Approved Journal No. 63716)
ISSN: 2454-5503
Impact Factor: 3.012 (IIJIF)

269

25.

# जागतिकीकरणाचा भारतीय शेती व्यवसायावर परिणाम

**प्रा.डॉ. श्रीनिवास पिलगुलवार**
समाजशास्त्र विभाग प्रमुख,
लोकमान्य महाविद्यालय, वरोरा. जि.चंद्रपूर
emil ID-snpilgulwar@gmail.com

**प्रस्तावना:** "जागतिकीकरण हा २० व्या शतकाच्या अखेरीचा आणि २१ व्या शतकाच्या प्रारंभीचा परवलीचा शब्द झाला आहे. जागतिकीकरण म्हणजे जगाच्या आर्थिक उत्क्रांतीची परमावधी असे मानले जाऊ लागले आहे. काही वर्षापूर्वी अमेरिकन विचारवंत**श्री फ्रान्सीस पूकूयामा** यांनी 'इतिहासाची अखेर' या आपल्या ग्रंथात असा विचार मांडला की, लोकशाही ही राजकीय प्रणाली व भांडवलशाही ही आर्थिकप्रणालीची **'मानवी इतिहासाची अखेर'**असे मानावे लागले. कारण या सर्वोत्कृष्ट प्रणालीआहेत. इतर सर्व वैयक्तिक प्रणालीवर मात करुन त्यांनी वर्चस्व सिध्द केले आहे. या प्रणालींना स्विकारण्याशिवाय पर्याय राहिलेला नाही." (दुभाषी: २०००)पूकूयामाचे हे मत पूर्वग्रहाने इच्छीत असले तरी त्यात तथ्य आहे हे मान्य करावेच लागेल. १९४७ साली भारत देश स्वतंत्र झाल्यानंतर पाश्चिमात्य देशातील भांडवलशाही व सोव्हियत रशियातील साम्यवाद या दोन परस्पर विरोधी प्रणालीचा पाठपुरावा न करता भारताने लोकशाही समाजवाद, मिश्र अर्थव्यवस्थेचा मधला मार्ग स्विकारला. परंतू ४० वर्षे या **"तिसऱ्या मार्गावर"** वाटचाल केल्यानंतर भारतालाही १९९१ साली चलन संकटात सापडल्यानंतर मुक्त बाजारी अर्थव्यवस्था, उदारीकरण व जागतिकीकरणासाठी आर्थिक सूधारणांचा कार्यक्रम हाती घ्यावा लागला होता. आता असे सर्वसाधारण मानले जाऊ लागलेआहे की भारताचे भविष्य जागतिक मुक्त अर्थव्यवस्थेशी अतूटपणे जोडले आहे.(दुभाषी: २०००)

## ➤ जागतिकीकरणाची संकल्पना:

जागतिकीकरण,वैश्वीकरण हे वस्तूतः एक दुसऱ्याचे पर्यायवाची शब्द आहेत, परंतू दोन्ही शब्दाचा अर्थ एकच आहे.जागतिकीकरण ही संकल्पना१९८०नंतर अध्ययनाचा विषय बनून जगाच्या समोर आली आहे. **"आंतरराष्ट्रीय समाजशास्त्राच्या"** मुखपत्राने जागतिकीकरणाला समजून घेण्यासाठी स्टॉकहोम येथे स्वीडनच्या विदेश मंत्रालयाच्या सहयोगाने १९९८ मध्ये एका संम्मेलनाचे आयोजन केले होते. या संम्मेलनात समाजशास्त्रज्ञांच्या एकागटाने जागतिकीकरणाला परीभाषीतकरण्याचा प्रयत्न केला. तिथे प्रकाशित केल्या गेलेल्या काही शोध निबंधाना **"आंतरराष्ट्रीय समाजशास्त्राच्या(International Sociology)"** अंकात प्रकाशितकरण्यात आले आहे.अंकाचे अतिथी संपादक जागतिकीकरणाच्या संदर्भात आपले मत व्यक्त करतांना म्हणतात. जागतिकीकरणाच्या संकल्पनेचा अविष्कार १९९० च्या दशकाच्या प्रारंभिक वर्षात झाला आहे. १९९२ मध्ये **ऐनी(Ianni)**आणि **रॉबर्टस्टन(Roberston)**यांनीसमाजशास्त्रात जागतिकीकरणाच्या संकल्पनेचा उपयोग आपल्याअध्ययनातसर्वप्रथमकेलाआहे. (International Sociology-Vol-15,2000) जागतिकीकरणाच्या संकल्पनेची व्याख्या करणे तसे कठीण काम आहे. कोणत्याही विचारवंताचे जागतिकीकरणाच्या संदर्भात एकमत आपणास पहावयास मिळत नाही. या संदर्भात आपणास असे म्हणतायेईल की, हत्ती आणि सात आंधळे यांच्या कहानीसारखी स्थिती जागतिकीकरणाची आहे. आंधळ्यांना हे काम सोपविल्या गेले की हत्तीला परीभाषीत करा. सात आंधळ्यांपैकी ज्याचा हात हत्तीच्या सोंडेला लागला त्याने सांगितले की हत्ती दोरीसारखा आहे. दूसऱ्याने हत्तीच्या पायाला स्पर्श केला. त्याला हत्ती खांबासारखा वाटला. अशीच ही कहानीसातही आंधळ्यांच्या सभोवताली फिरते. तशीच काहीशी परिस्थिती जागतिकीकरणाच्या परीभाषेच्या संदर्भातआहे. काही विचारवंतजागतिकीकरणाचा सहसंबंध आर्थिक घटकांशी जोडतात. त्यांच्यासाठी जागतिकीकरण हे उदारीकरण आणि खाजगीकरण पण आहे. काही विचारवंतांना जागतिकीकरणाचा सहसंबंध हा सांस्कृतिक आदान-प्रदानाच्या संदर्भात महत्वपूर्ण वाटतो. तर काही समाजशास्त्रज्ञांना असे वाटते की, जागतिकीकरण ही बृहद सामाजिक प्रक्रिया असून जी संपूर्ण मानवी जीवनाला आज प्रभावित करीत आहे. ज्यात शेती हा घटकही समाविष्ट आहे.

जागतिकीकरणाला स्पष्ट करण्यासाठी काही विचारवंतांनी जागतिकीकरणाच्या परीभाषा स्पष्ट केल्या आहेत. त्यात समाजशास्त्रज्ञ १) **वेलरस्टन आणि रॉबर्टसन**जागतिकीकरणाच्यासंदर्भात लिहितांना म्हणतात,"जागतिकीकरणअशीप्रक्रियाआहे जिचा मुख्य उद्देश भांडवलवादाचा विस्तार आणि समृध्दी करणे हा आहे." २) **सि.पी.खेर**म्हणतात,"जागतिकीकरणात



Assistant Professor
Lokmanya Mahavidyalaya, Warora
Dist. Chandrapur
288
Scanned with CamScanner

Chronicle of Humanities and Cultural Studies
(UGC Approved Journal No. 63716)
ISSN: 2454-5503
Impact Factor: 3.012 (IIJIF)

व्यापार, वित, रोजगार, तंत्रज्ञान, विदेशी स्थलांतर, पर्यावरण, राहणीमान, प्रशासन, समाजव्यवस्था, संस्कृती, शिक्षण इ. सर्व घटकांमध्ये होणारे परिवर्तन म्हणजे जागतिकीकरण होय." ३) **मेलकॉम** यांच्या मते,"जागतिकीकरण ही अशी सामाजिक प्रक्रिया आहे ज्यात सामाजिक आणि सांस्कृतिक व्यवस्थेवर जो भौगोलिक दबाव असतो तो दूर होतो आणि लोकांनाही असे वाटू लागते की भौगोलिक मर्यादांना काही अर्थ नाही." ४) **श्रावण कुमारसिंग** यांच्या मते," जगातील सर्वच राष्ट्रांची एकच बाजारपेठ निर्माण करणे व जगातील साधन सामग्रीचे आणि भांडवलाचे सहजतेने परिचलन निर्माण करणेम्हणजे जागतिकीकरण होय." ५) **अँथनी गिड्नेस**यांच्या मते, "जागतिकीकरणम्हणजे जगभरात सामाजिकसंबंधाचे सघनीकरण घडून येणे होय."

## ➢ अध्ययन पद्धती:

कोणत्याही संशोधकाला संशोधन करायचे असेल तर ते संशोधन वैज्ञानिक पद्धतीच्या आधारावरच करावे लागते.वैज्ञानिक पद्धतीमध्ये स्थित ज्या काही संशोधनाच्या अध्ययन पद्धती असतील त्यातल्या काही तंत्राचा किंवा घटकांचा अवलंब करुन संशोधन कार्य पार पाडावे लागते. वैज्ञानिकअध्ययन पद्धतीच्या अभावापायी केले गेलेले संशोधन हे संशोधन नसते तर ते केवळ माहीतीचे एकत्रीकरण असते. म्हणून प्रस्तुत शोध निबंधासाठी व्दितीयक तथ्य संकलन पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे.तथ्य संकलनासाठी शासनाचे वार्षिक अहवाल, ऐतिहासिक कागदपत्रे, अध्ययन विषयाशी निगडीत प्रकाशित-अप्रकाशित लेख, संदर्भ ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे, कृषी मंत्रालयाचे वार्षिक अहवाल, इतर संशोधकाचे संशोधन इ. चा आधार घेण्यात आला आहे. तसेचप्रस्तुत शोध निबंधाचा सैद्धांतिक दृष्टीकोन मार्क्सवादी असून मार्क्सवादीदृष्टीकोनातूनच अध्ययन समस्येचा अभ्यास करण्यात आला असून त्या आधारावरच निष्कर्ष काढण्यात आले आहेत.

## ➢ अध्ययनाचे उद्देश:

१. मार्क्सवादी दृष्टीकोणातून जागतिकीकरणाची संकल्पना समजून घेणे.
२. जागतिकीकरणाचा भारतीय शेती व्यवसायावर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.
३. जागतिकीकरणशेतीतील वसाहतवादाकडून शेतीतील साम्राज्यवादाकडे जात आहे का,ते अभ्यासणे.

## ➢ गृहीत कृत्ये:

१. जागतिकीकरणाचे भारतीय शेतीवर सकारात्मक परिणांमापेक्षा नकारात्मक परिणाम अधिक होताना दिसत आहेत.
२. जागतिकीकरणामुळे शेतीतीलवसाहतवादाच्या माध्यमातून बहुराष्ट्रीय कंपन्याचेसाम्राज्य निर्माण होत आहे.

## ➢ विश्लेषणात्मक निर्वचन:

शेतीहा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. भारत हा खेड्यांचा व शेती कसणाऱ्या लोकांचा देश आहे. ही ओळख भारताची आजही जगभर आहे.शेती हाराष्ट्रीय उत्पन्नाचा महत्वपूर्ण घटक आहे. हरितक्रांतीने भारत अन्नधान्यात समृध्द झाला.भारतातील लोकसंख्या वाढत असतांना, सरकार व्दारे चालविले जाणारे सार्वजनिक उपक्रम जागतिकीकरणाच्या रेट्यामुळे बंद होत आहेत. सघंटित क्षेत्रातील रोजगार दिवसे-दिवस कमी होत आहे. सेवा क्षेत्राचा विकास अलिकडिल काळात तीव्र गतीने करण्याचा प्रयत्न सरकार करित आहे.ज्यातूनअधिकरोजगारनिर्माण केला जाईल अशी शासनकर्त्यांना अपेक्षाआहे. असे जरी असले तरी अनेक अर्थशास्त्रज्ञांना असे वाटते की, शासनकर्त्यांनी इतर क्षेत्रात रोजगारांच्या नवीन संधीउपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न करावा. कारण शेतीचा संबंधहा भारतातील गरिबांशी आणि त्यांच्या गरिबीशी जुळलेला आहे.जागतिकीकरणाची प्रक्रियास्वीकारल्यानंतर या प्रक्रियेचा सर्वाधिक मोठा परिणाम हा भारतातील शेतकरी व गरिबांवर होत असलेला दिसून येत आहे.

### I

**"भारताने १९९१ ला जागतिकीकरणाचा स्वीकार केल्यानंतर १९९६–९७ मध्ये राष्ट्रीय उत्पन्नातील २७.१%उत्पन्नशेतीतून, ३०.६%उद्योगातून आणि ४२.३%सेवाक्षेत्रातून झाले आहे. महत्वाची बाब म्हणजे १९९१ च्या जनगणनेनुसार एकूण ३० कोटी ६० लाख कष्टकऱ्यांपैकी २४ कोटी ७० लाख ग्रामीण आणि ५ कोटी ९० लाख शहरी कष्टकरी होते. त्यातही ग्रामीणकष्टकऱ्यांपैकी १८ कोटी ८७ लाखकष्टकरीशेतकरी, जंगल कामगार, मच्छिमार, खाण मजदूर हे होते. त्याचवेळीसंघटीत क्षेत्रातील कर्मचाऱ्यांची एकूण संख्या १९९१मध्ये २ कोटी ७० लाखहोती. ज्यामध्ये केंद्र आणि राज्य सरकार, स्थानिक स्वराज्यसंस्थाआणि खाजगी क्षेत्र यांचा समावेश आहे.जागतिकीकरणाचा सर्वात मोठा परिणाम हा**



Scanned with CamScanner

शेतकरी, शेतमजूर आणि शेतीशी संबंधीत काम करणाऱ्या लोकांवर झाला आहे. (खातू:२०००) **ऑर्थर डंकेल** यांनी मांडलेल्या प्रस्तावाच्या माध्यमातून WTOची स्थापना १९९५ ला करण्यात आली.WTO हे १९४८ च्या GATTची सुधारित आवृत्ती आहे.WTO च्या माध्यमातून सदस्य राष्ट्रांना शेतमाल व्यापार विषयक करार करणे बाध्य झाले. या कराराचा सर्वात वाईट परिणाम भारतीय शेतीवर होत आहे. त्याची विस्तृत चर्चा खालील प्रमाणे करण्यात आली आहे.

## II

WTOच्या माध्यमातून करण्यात आलेल्या शेतमालव्यापार विषयक करारात शेतीतील उत्पादीत मालाचा व्यापारWTOच्यासदस्य राष्ट्रामध्ये सुलभरित्या व्हावा यासाठी विकसीत, विकसनशील व अविकसीत राष्ट्रांनी वस्तूंच्या आयातीवरील कर स्वरुपात लावण्यात येणारे निर्बंध शिथिलकरावेत अशी तरतूद केली. आयात शुल्कातील शिथिलता किंवा कपाती संदर्भात नियम तयार करण्यात आला.विकसीतराष्ट्रांनी३६%, विकसनशीलराष्ट्रांनी२४% व अविकसीतराष्ट्रांनी ०%आयातवस्तूवरशुल्क आकारावे अशी तरतूदकरण्यातआली.

"आयातीवरील सर्व निर्बंध दूर करण्याच्या धोरणांचा एक भाग म्हणून भारताने १९९६ पासून आयातीवरील संख्यात्मक निर्बंध उठविण्यास सुरुवात केली.१९९५–९६ साली ६१६१ वस्तू,१९९७–९८ साली ३८१ वस्तू, १९९८–९९ साली २६५७ वस्तूवरीलआयातीसाठीचे निर्बंधभारत सरकारने शिथिल केले." (कराडे: २००८). आयातीवरीलनिर्बंधाच्या शिथिलकरणाचा परिणाम म्हणजे, विदेशी कंपन्यांना अगदी सहजरित्या कमी आयात दरात विकसनशील व विकसीतराष्ट्रांच्या बाजारपेठा मिळाल्या. या कराराचा फायदाविकसीत राष्ट्रांना अधिक झाला. आयात करांच्या शिथिलते वरोबर आणखी एक अट या करारात अशी होती की, जागतिक पातळीवरील व्यापारात संतुलीतपणा यावा यासाठीWTO च्यासर्व सदस्य राष्ट्रांनी आपल्या देशातील एकूण अन्नधान्याच्या उत्पादनापैकी ५%अन्नधान्य दरवर्षी आयात करावे हे बंधन घालण्यात आले. याचा परिणामभारतातील शेतकऱ्यांवर खूप मोठ्या प्रमाणावर होत आहे. उद्धा:-देशात साखरेचे उत्पन्न मागील काही वर्षांत अधिक होत आहे. असे जरी असले तरी भारत पाकिस्तान व इतर देशांकडून साखर खरेदी करत आहे. याचा परिणाम म्हणून देशातीलशेतकऱ्यांच्या उसाचे व साखरेचे दर पडत आहेत. शेतकरी पुन्हा कर्जाच्या खाईत लोटल्या जात आहे.

## III

जागतिकीकरणाच्या अंमलबजावणीमुळे अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांनी भारतीय बाजारपेठांमध्ये प्रवेश केला आहे. WTO च्या शेतमाल व्यापार विषयक करारात अशी तरतूद करण्यात आलीआहे की,बहुराष्ट्रीय कंपन्यांना शेती क्षेत्रातील व्यवसाय करण्यासाठी सदस्य राष्ट्रांनीबाजारपेठ उपलब्ध करुन द्यावी. कारगील सीड्स, बेजो, शीतल सीड्स, सॅंडोज, पायोनियर, ओव्हरसाईजकार्पोरेशन, आय.टी.सी., ॲग्रोटेक, हिंदुस्थान लिव्हर इ. सारख्या बहुराष्ट्रीयकंपन्या शेतीसाठी लागणाऱ्या बी-बियाण्यांच्या बाजारात उतरल्या आहेत. अशा बहुराष्ट्रीयकंपन्यांकडे ग्राहकांच्या खिश्यातील पैसे काढून घेण्याचे कसब वादातीत आहे. याची अनेक उदाहरणे देता येतील. अमेरिकेतून आयात केलेला मका स्वस्त असतो. म्हणून फिलिपिन्स आणि मेक्सिको या देशांनी मक्याची मोठ्या प्रमाणात आयात केली. परंतू त्यामुळे त्या देशातील लक्षावधी मका उत्पादक शेतकरी बेकार झाले आहेत. (गायकवाड: २००७). शेतीमालाचा व्यापार करणारा जगातील सर्वात मोठा देश म्हणून अमेरिकेकडे पाहीले जाते. काही आंतरराष्ट्रीय कंपन्या भाडेतत्वावर शेती करुन आपल्या उत्पादनाशी संबंधीत लागणारा कच्चामाल उत्पादीत करीत आहेत. यापूढे जाऊन **विशेष आर्थिक क्षेत्राच्या**(SEZ) च्या माध्यमातून बहुराष्ट्रीय कंपन्या कच्च्या मालाच्याउत्पादनासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी खरेदी करुन शेतकऱ्यांना कंगाल करीत आहेत.

## IV

जागतिकीकरणाचा स्वीकार करतांनाWTO च्यासदस्य राष्ट्रांसाठी विकसीतदेशांनी**'संरचनात्मक समायोजन कार्यक्रम'**-(Structural Adjustment Programme-SAP) चा स्वीकार करण्याची अट घातली होती. या करारात अशी तरतूद करण्यातआली होती की,WTO च्या सदस्य राष्ट्रांनी आपल्या देशातील शेतकऱ्यांना देण्यात येणारे अनूदान व सबसिडी बंद कराव्यात. भारतानेही शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या बऱ्याच शेतीशी संबंधीतअनूदानात कपात करण्यास सुरुवात केली आहे. याचा परिणामम्हणूनभारतातील शेतकरी आत्महत्येच्या समस्येला सामोरे जात आहे. भारतातील जवळपास ६४% लोकसंख्या आजही शेतीवर आधारीत व्यवसाय करुन आपला उदरनिर्वाह करीत आहेत. सरकारने शेती क्षेत्रातील आपली गुंतवणूक कमी केल्यामुळे भारतातीलशेती ही नेहमी तोट्यात चालणारा बिनपर्यायी व्यवसायम्हणूनशेतकरी तीचा स्वीकार करत आहे. भारतासारख्या देशातीलशेतीसारख्याव्यवसायाचे सातत्य हे सार्वजनिक गुंतवणूकीवर अवलंबून आहे.या करारामुळे सरकार त्यांच्यापासून काढता पाय घेत असल्यामुळे भारतीय शेतकरी देशोधडीला लागत आहे.



Assistant Professor
Lokmanya Mahavidyalaya, Wa
Dist. Chandrapur

Scanned with CamScanner

Chronicle of Humanities and Cultural Studies
(UGC Approved Journal No. 63716)
ISSN: 2454-5503
Impact Factor: 3.012 (IIJIF)

अमेरिका, जपान, द.कोरिया, युरोप, इ. विकसीत राष्ट्र मात्र आपल्या देशातीलशेतकऱ्यांनाशेतीमालावर आणि शेतीशी संबंधीत बाबींवर अनूदान आणि सबसिडीदेतात याची काही उदाहरणे सांगणे येथे गरजेचे आहे.जपान ७२.५%, अमेरिका २९%, द.कोरिया ६१%, युरोप ६७%, इ.राष्ट्र हे आपल्या देशातील एकूण कृषीउत्पादन्नाच्या प्रमाणात एवढ्या मोठ्याप्रमाणातआपल्याशेतकऱ्यांनाअनूदाने देतात. त्यामुळे तेथील शेतकरी हा सुखी व समाधानी आहे. पंरतु हेच विकसीत राष्ट्रविकसनशील व अविकसीत राष्ट्रांना शेतीशीसंबंधीत अनूदाने बंद करण्यात यावी याचा आग्रह धरतात. याचाच अर्थ असा की विकसनशीलदेशातीलशेतकऱ्यांना देशोधडीला लावून जागतिक पातळीवरील अन्नधान्यांची बाजारपेठ पुर्णपणे आपल्या नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न विकसीत राष्ट्र करित आहेत.

## V

ऐतिहासिक दृष्ट्यापाहिले तर शेतीमधील अन्नाचाउपभोग आणि उत्पादनसंबंध हे दोन्ही राजकीय व भौगोलीक घटकांवरअवलंबूनराहिलेले आहेत. जागतिकपातळीवरीलसाम्राज्यशाहीच्याविकासाचाजेंव्हाआपणविचारकरतो. तेंव्हापाश्चिमात्य प्रगतअसल्याने ते औद्योगीककिंवातत्समवस्तूंचेउत्पादनकरतात आणि पूर्वेकडीलकिंवाअविकसीतअसणारे राष्ट्र अन्न धान्यांचेउत्पादनकरतात अशी आपलीसमजूतआहे. अशाप्रकारची विभागणी बदलून घेणेम्हणजेविकास, म्हणजेचं शेतीवरअवलंबूनअसलेलेउत्पन्नकमीकरुनवस्तूंचेउत्पादन अधिकाधिक करणेम्हणजेविकास ही अलीकडील काळात विकासाचीव्याख्या झाली आहे.

१८ व्या शतकातइंग्लड हा देशपहिलाऔद्योगीकदेशम्हणून पूढे आला आहे. इंग्लडनीउद्योगांच्यामाध्यमातूनजगभरआपलेसाम्राज्य २० व्या शतकाच्या मध्यांपर्यंतकायमठेवले होते. वसाहतवादाच्यामाध्यमातूनआपलेसाम्राज्य प्रस्थापित करण्याचेकामब्रिटिशांनी केले होते."१९ व्या शतकात युरोपमधूनफारमोठ्याप्रमाणाततलोक स्थालांतरीत होऊनअमेरिकेतस्थायिकझाले, त्या काळात जी नवीनअर्थव्यवस्थाउभीराहीलीतिचा शेतीविभाग या बाहेरदेशातूनआलेल्यानिर्वासितांनीसाभाळला.अमेरिकेतून युरोपमध्ये धान्य व कापूस यांचीस्वस्तदरातनिर्यातहोऊलागल्यानंतरत्यातून युरोप व अमेरिका याच्यांतीलऔद्योगीकक्रांतीलाचालना मिळाली. अमेरिकेत कृषीउद्योगकंपन्यांचाविकास १९३० च्याजागतिकमंदीच्या काळात झाला. मंदीमुळेऔद्योगीकवस्तूपेक्षा शेतमालाच्याकिंमती अधिक घसरल्याहोत्या. तेंव्हा शेतीतीलउत्पादकांनासंरक्षणदेण्यासाठीअमेरिकेतील शासनाने शेतमालाच्याआयातीवरबंदी घातली. आणि शेतमालाच्याकिंमतीनाआधार देण्याचे धोरणअवलंबविले. त्याचापरिणामम्हणून शेतमालाचेदेशातीलउत्पन्नमागणीपेक्षा अधिक झाले. हा जादामाल (पी.एल.४८०) या कार्यक्रमाखालीअमेरिकनसरकारनेइतरराष्ट्रांनामदतम्हणूनस्वस्तदराने धान्य देण्यासाठीवापरला. या कार्यक्रमातूनकारगिल आणि कॉन्टिनेंटल या शेतमालाचाव्यापारकरणाऱ्यामोठ्याकंपन्याचीभरभराटझाली.(पंडित:२००४). अशाकाहीमोजक्याबोटावरमोजण्या इतक्या शेती क्षेत्रात कामकरणाऱ्याबहुराष्ट्रीय कंपन्यानीज्यातमॉन्सेटो, पायोनियर, ॲग्रोवन, कारगिल, कॉन्टिनेंटल इ. नी जगातील ८०% शेतीव्यवसायांवरआपलेप्रभुत्व व अधिपत्य निर्माण केले आहे.

## VI

"डंकेलकरारावरसहीझाल्यावर कृषीउद्योगकंपन्याअलीकडील काळात भारतात येऊलागल्या आहेत. इतरदेशातील त्यांच्या व्यवहाराचेनिरिक्षणकेले तर असेदिसते कीकाही ठिकाणी त्या स्वतः शेतीतूनउत्पादनझालेलेपदार्थविकत घेवून त्या बाजारपेठेवरनियंत्रण ठेवूइच्छितात. निरनिराळ्यावस्तूपूरविण्यासाठी शेतकऱ्यांशीकरारकरुनत्यांचीमोठ्याप्रमाणावर त्या कंपन्याविक्रीकरतात. दक्षिणेतीलअविकसीतदेशांत या बहुराष्ट्रीय कंपन्यापरदेशातूनआयातकेलेले धान्य स्थानिकबाजारातविकून धान्याचेभाव खालीआणतात. त्यामधून शेतकऱ्यांचेनूकसान होते. अशामोठ्याकंपन्याकडेभरपूरभांडवलअसल्यामुळे त्या गरिब शेतकऱ्यांच्याजमिनी हीविकत घेतात. जमिनविकुन शेतकऱ्यालामिळालेलेपैसेथोड्याचदिवसात खर्चहोतात. याचापरिणामम्हणून शेतकरी हा शेतमजूरबनतो. मेक्सिको व चिली या देशात ही परिस्थितीनिर्माणझाली आहे. खूल्याव्यापाराचेतत्वस्वीकारुनगॅटकरारावरभारतानेसह्याकेल्यामुळे पूढीलकाहीवर्षातभारतीय शेतकऱ्यांचीपरिस्थितीअशीचहोणार आहे.(पंडित:२००४).

नविन आर्थिक धोरणानुसार खुल्या व्यापाराचे तत्व भारताने स्वीकारल्यामुळे कारगिल, कॉन्टिनेंटल, मोन्सॅन्टो या कंपन्या भारतात येऊन आपला पाय रोवल्या आहेत. कमाल जमीन धारणा कायदा व साखर कारखान्यासाठी लागणारे परवाने रद्द करण्यात यावेत यादृष्टीने त्यांचे प्रयत्न सुरू आहेत. जर असे भविष्यात मंजूर झाले तर महाराष्ट्र व उत्तर प्रदेशातील साखर उद्योग त्यांच्या हातात जाण्यास फार वेळ लागणार नाही. अशा कारनाम्यातूनच या बहुराष्ट्रीय कंपन्या वसाहतवादी धोरणातून आपले साम्राज्य शेतीव्यवसायाच्या क्षेत्रात निर्माण करीत आहेत. अशा उद्देशात काही कंपन्या



Assistant Professor
Lokmanya Mahavidyalaya, Warora
Dist. Chandrapur



Scanned with CamScanner

Chronicle of Humanities and Cultural Studies
(UGC Approved Journal No. 63716)
ISSN: 2454-5503
Impact Factor: 3.012 (IIJIF)

यशस्वी ही होत आहेत. वेळीच यांना पायबंद घालून आपले सार्वभौमत्व भारतीयांनी टिकवून ठेवणे गरजेचे आहे. यापूर्वी भारताने ईस्ट इंडिया कंपनीचा अनुभव घेतलेला आहे. तेव्हा एका कंपनीमुळे आपण १५० वर्षे पारतंत्र्यांत गेलोत आता अशा वसाहतवादाच्या माध्यमातून आपल्या साम्राज्याचा विस्तार करणाऱ्या बहुराष्ट्रीय कंपन्याची संख्या अधिक असल्याने अशा समस्येपासून प्रत्येक भारतीयांनी सजग राहणे आवश्यक आहे.

## ➢ अध्ययनाचे निष्कर्ष :-

१. जागतिकीकरणाच्या स्वीकारानंतर शेती व्यवसायातील रोजगार कमी झाला आहे.
२. जागतिकीकरणाचा सर्वात मोठा नकारात्मक परिणाम शेतकरी, शेतमजूर व शेतीशी संबंधित काम करणाऱ्या लोकांवर झाला आहे, असे अनेक अर्थशास्त्रज्ञांचे मत आहे.
३. WTOच्या माध्यमातून करण्यात आलेल्या शेती विषयक कराराचा वाईट परिणाम भारतीय शेतीवर होत आहे.
४. आयातीवरील कराच्या शिथिलीकरणाचा नकारात्मक परिणाम देशाच्या आर्थिक उत्पन्नावर होत आहे.
५. आयातीलवरील कराचे शिथिलीकरण विकसनशील व अविकसीत राष्ट्रांचे आर्थिक शोषण करणास सहाय्यंकठरत आहे.
६. संरचनात्मक समायोजनाच्या कार्यक्रमातून (SAP) भारताचे शोषण होत आहे.
७. शेतीशी संबंधित अनुदानावरील कपातीचा परिणाम शेतकऱ्यांच्या समस्या वाढवित आहे.
८. भारत सरकारने शेतीवरील गुंतवणुक कमी केल्यामुळे शेती ही तोट्याचा व्यवसाय बनली आहे.
९. विकसित राष्ट्रांची शेतकऱ्याच्या अनुदानाबाबत दुटप्पीपणाची भुमिका आहे.
१०. WTO च्या शेतीविषयक कराराच्या माध्यमातून विकसनशिल देशातील शेतकऱ्यांना देशोधडीला लावण्याचे काम विकसित राष्ट्र करीत आहेत.
११. जगतिक पातळीवरील अन्नधान्याच्या बाजारपेठेवर मक्तेदारी निर्माण करण्याचे प्रयत्न विकसित राष्ट्र करीत आहेत.
१२. शेतीव्यवसायातील वसाहतवादाला अलिकडील काळात अमेरिकन बहुराष्ट्रीय कंपन्याकडून सुरूवात झाली आहे.
१३. अमेरिकेच्या पी.एल.४८० या कार्यक्रमाअंतर्गत विकसनशिल व अविकसीत राष्ट्रांच्या शोषणाला चालना मिळत आहे.
१४. अमेरिकेतील बहुराष्ट्रीय कंपन्या (उदा. कारगील, कॉन्टिनेंटल इ.) शेतीव्यवसायात आले साम्राज्य निर्माण करीत आहेत.
१५. अमेरिकन बहुराष्ट्रीय कंपन्याची एकाधिकारशाही शेती व्यवसायात मक्तेदारी निर्माण करीत आहे.
१६. शेतमाल व्यापार विषयक जागतिक कराराच्या माध्यमाद्वारे बहुराष्ट्रीय कंपन्या भारतातील कमाल जमीन धारणा कायदा रद्द करण्याचा प्रयत्न करीत आहेत.
१७. सहकारी साखर कारखान्यांचे परवाने रद्द करण्याचा प्रयत्न बहुराष्ट्रीय कंपन्याच्या माध्यमातून सुरू आहे.
१८. बहुराष्ट्रीय कंपन्याच्या शेतीव्यवसायातील वाढत्या हस्तक्षेपामुळे देशाच्या सार्वभौमत्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे.
१९. शेती व्यवसायाच्या माध्यमातून बहुराष्ट्रीय कंपन्या आपले साम्राज्यवादी धोरण आवलंबवित आहेत.

## ➢ सिफारशी :-

१. शेती व्यवसायाच्या अस्तीत्वासाठी शेतीवरील रोजगाराला चालना देणे आवश्यक आहे.
२. शेतीवरील अनुदानात कपात न करता त्यात अधिक वाढ करणे गरजचे आहे.
३. शेतीतील रोजगारीचे प्रमाण वाढविण्यासाठी "महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा" शेतीवरील रोजगारासाठी लागू करावा.
४. आयातीवरील कराच्या शिथिलीकरणाचा पूर्नविचार व्हावा. कारण भारतात निर्यातीपेक्षा अधिक वस्तू आयात केल्या जातात.
५. संरचनात्मक समायोजनाच्या कार्यक्रमाचा त्याग करून भारताने स्वतःचा नविन कार्यक्रम शेतीव्यवसासाठी सुरू करावा.
६. बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या साम्राज्यवादी धोरणाविरोधात कडक धोरण निर्माण करणे आवश्यक आहे.
७. देशाच्या सार्वभौमत्वाला धोका निर्माण होणार नाही याचा विचार करणे आवश्यक आहे.
८. बहुराष्ट्रीय कंपन्याच्या शोषणापासून भारतीय शेती व शेतकऱ्यांना शासनाने मुक्त करावे.
९. जागतिकीकरण व बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या साम्राज्यवादी धोरणाविरोधात शेतकऱ्यांच्या संघटनांनी वेळीच लढा देणे आवश्यक आहे.

Assistant Professor
Lokmanya Mahavidyalaya, Waro:
Dist. Chandrapur



Scanned with CamScanner

Chronicle of Humanities and Cultural Studies
(UGC Approved Journal No. 63716)
ISSN: 2454-5503
Impact Factor: 3.012 (IIJIF)

## ➢ संदर्भ ग्रंथ :-

१. आगलावे, प्रदीप. सामाजिक संशोधन पद्धती आणि तंत्रे, नागपूर : साईनाथ प्रकाशन, २००७
२. कऱ्हाडे, जगन. जागतिकीकरण : भारतासमोरील आव्हाने, २००८
३. खातु, गजानन. जागतिकीकरण : परिणाम आणि पर्याय, पुणे : अक्षर प्रकाशन, २०००
४. खेर, सी. प. जागतिकीकरण समस्या आशय आणि अनुभव, पुणे : दिलीपराज प्रकाशन, २००६
५. गायकवाड, मुकुंद. जागतिकीकरण शाप नव्हे वरदान!, पुणे : कॉन्टिनेंटल प्रकाशन, २००१
६. गोविलकर, विनायक. जागतिकीकरण आणि जागतिक व्यापार संघटना. नाशिक : ब्रेन टॉनिक प्रकाशन, २००७
७. भागवत, विष्णु. जागतिकीकरण नवीन गुलामगिरी, नागपूर : समता प्रकाशन, २००७
८. पंडीत, नलिनी. जागतिकीरण आणि भारत, मुंबई : लोक वाङ्मयगृह, २००४
९. देसाई, श्री. मु, भालेराव निर्मल. कृषीअर्थशास्त्र आणि भारतातील शेतीव्यवस्था, पुणे : निराली प्रकाशन, २००६
१०. दुभाषी, पद्माकर. जागतिकीकरण, उदारीकरण आणि अर्थकारण
११. बगाटे, राजेंद्र. मनिषा सामपुरे. जागतिकीकरणाचे भारतीय शेतीवरील परिणाम, Grip-the standard research, vol-4, October, 2012
१२. खोडके, बाबुराव. जागतिकीकरण व भारतीय शेतीवरील परिणाम, Golden Research Thought, Vol-6, Issue-9, 2017, pp 1-3
१३. Gautam, Seema. Some reflections of globlisation on Indian Agriculture, Vol-1, 2014, p-157
१४. Rani, Nirmla. Impact of globlisation on Indian Agriculture, Vol-3, Issue-12, 2014 pp 61-64
१५. www. ibp.world .com
१६. www.ijesrr.org
१७. www.indiatogether.org

□□□

Assistant Professor
Lokmanya Mahavidyalaya, Waror
Dist. Chandrapur



Scanned with CamScanner